| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **1.** | प्रभादेवी (मुंबई) येथील ब्ल्यू मोंड या गगनचुंबी इमारतीला ३२ व्या आणि ३३ व्या मजल्यावर भीषण आग लागली असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, परंतु अग्निशमन दलाकडे ३३व्या मजल्यावर पोहचण्यासाठी एवढी मोठी शिडीच नसणे, तसेच इमारतीमधील सर्व रहिवाशांना ४८ तासाहून अधिक काळ बाहेर राहावे लागणे, त्यामुळे, मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये एकीकडे गगनचुंबी इमारती उभ्या राहत असणे, परंतु तेवढ्या क्षमतेची अग्निशामक यंत्रणा उपलब्ध नसणे, त्यामुळे, अग्निशामक दलाला अशा मोठ्या इमारतींना लागलेल्या आगी विझवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असून त्यातून मोठी जीवितहानी होण्याचा धोका असणे, तसेच, कमला मिल कंपाऊंड मध्ये लागलेल्या आगीच्या प्रकरणा नंतर महापालिकेने कडक कारवाई ची मोहीम हाती घेतली असणे, त्यामुळे, मुंबई महापालिका क्षेत्रातील अग्निशामक यंत्रणा देखील अत्याधुनिक व सर्व सुविधांनी सज्ज अशी असण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **नगरविकास विभाग** |
| **2.** | ''राज्यातील शेतक-यांनी शेतातल्या भाज्या आणि दुध उत्पादकांनी हजारो लिटर दुध रस्त्यावर ओतून १० दिवसांच्या ''गाव बंद'' आंदोलनास दिनांक ०१ जून, २०१८ पासून केलेली सुरुवात, शेतक-यांना संपूर्ण कर्जमाफी, शेतीमालाला किमान हमी भाव आणि दरमहा निश्चित उत्पन्नाची खात्री याबरोबरच दुध संघावरील बरखास्तीची कारवाई तसेच दुध वाढीचा दराबाबत शासनाने कांही महिन्यापुर्वी घेतलेल्या निर्णयाची अमंलबावणी करण्यात होणारे दुर्लक्ष, राज्यात दुध भुकटीचा तुडवडा, तसेच कर्नाटक शासनाप्रमाणे दुधाना प्रति लिटर ५ रुपये प्रमाण राज्य शासनाने अनुदान द्यावे या मागणी मान्य व्हाव्यात यासाठी शेतक-यांनी सुरु केलेले आंदोलन, सदर आंदोनलामुळे भाज्या आणि दुध यांच्या तुटवड्यामुळे दिवसेंदिवस वाढणारी महागाई, तसेच लहान | **दुग्धविकास विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | मुलांना दुधापासून वंचित रहावे लागत असल्याने नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, शेतक-यांच्या रास्त मागण्यांबाबत निर्णय घेण्याबाबत शासनाने करावायाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | |
| **3.** | "नागपूर येथील अक्षय अनिल बिंड रा.चितार ओळी इतवारी, सागर गंगाधर सहस्त्रबुधे लुबीनीनगर जरीपटका, स्नेहल प्रकाश मोटघरे रा.भीम चौक जरीपटका हे अक्षय बिंडच्या चार मित्रासह अंबाझरी परिसरात असलेल्या क्रेझी कॅसल वॉटरपार्कमध्ये दिंनाक २० मे २०१८ रोजी गेले असता कृत्रिम लाटाव्दारे तयार करण्यात आलेल्या वॉटरपार्कमध्ये सदर सातही विद्‌यार्थ्यांसह ईतर काही नागरिक पाण्याचा आनंद घेत असतानाच सातही विद्‌यार्थी आणि एक महिला वॉटरपार्कमध्ये बुडत असल्याचे दिसून येताच आरडाओरड सुरू होणे, त्या ठिकाणी असलेल्या क्रेझी कॅसल वॉटरपार्कच्या कर्मचाऱ्यांसह व्यवस्थापनास तातडीने वॉटरपार्क बंद करण्याची नागरिकांनी केलेली विनंती करणे, नागरिकांच्या विनंतीकडे व्यवस्थापनांनी केलेले दुर्लक्ष वॉटरपार्क सुरू ठेवल्याने अक्षय अनिल बिंड, सागर गंगाधर सहस्त्रबुधे या दोन हुशार विद्‌यार्थ्यांचा वॉटरपार्कमध्ये बुडून मृत्यू होणे, तर स्नेहल प्रकाश मोटघरे ही गंभीर जखमी झाल्याने तिला खाजगी रूग्णालयात भरती करण्यात आले असून चार विद्‌यार्थी आणि एक महिलेला वाचविण्यात नागरिकांना यश आलेले त्या ठिकाणी उपस्थित असलेले कर्मचारी, सुरक्षा रक्षक आणि बाऊंसर यांनी बघ्याची भुमिका घेऊन कुठलिही मदत केली नसल्यामूळेच सदर विद्‌यार्थ्यांचा मृत्यू होणे, सदर घटना घडण्यापुर्वी तिथे उपस्थित असलेल्या दोन गार्ड यांनी एका जोडप्याला बुडण्यापासून वाचविण्यात आल्याची माहिती उघडकीस येणे, असे असतांनाही व्यवस्थापनाने पैशाच्या हव्यासापोटी सदर वॉटरपार्क सुरूच ठेवल्याने दोन निरपराध हुशार विद्‌यार्थ्यांचा बळी जाणे, या गंभीर घटनेची तक्रार पालकांनी बजाजनगर पोलीस ठाण्यात करणे, बजाजनगर | **गृह** विभाग |

| | | |
|---|---|---|
| | पोलीसांनी तपास सुरू केले असता, दोन हुशार विद्यार्थ्यांचा जीव घेणाऱ्या वॉटर पार्क क्रेझी कॅसल येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून अपघाताचे फुटेज नष्ट करण्यात आल्याची बाब उघडकीस येणे, डीव्हीआरची तपासणी केली असता त्यात गेल्या चार महिन्याचे फुटेज गायब असल्याची धक्कादायक माहिती पोलीसांच्या निर्देशनास येणे, सदर क्रेझी कॅसल वॉटर पार्क हे हल्दीराम फुड इंटरनॅशनल लि.कंपनीच्या मालकीचे असून ही जागा नागपूर सुधार प्रन्यासने क्रेझी कॅसल वॉटर पार्कसाठी लिजवर दिलेली असणे, नागपुर सुधार प्रन्यास ने लिज रद करून सदर जागा मेट्रो करीता देवून क्रेझी कॅसल वॉटर पार्क बंद करण्याची नोटीस देण्यात येणे, मात्र या नोटीशीकडे व्यवस्थापकानी दुर्लक्ष करून क्रेझी कॅसल वॉटर पार्क सुरूच ठेवणे, असे असंतानाही हल्दीराम फुड इंटरनॅशनल लि.कंपनीच्या संचालकानी मात्र क्रेझी कॅसल वॉटर पार्क बंद केल्यास आमचे २०० कोटी रूपयांचे नुकसान होणार असल्याने २०० कोटी रूपयांची आर्थिक नुकसान भरपाई देण्याची मागणी नागपुर सुधार प्रन्यास कडे करणार, परंतू दोन विद्यार्थ्यांचा बळी घेणाऱ्या क्रेझी कॅसल वॉटर पार्कचे व्यवस्थापन आणि हल्दीराम फुड इंटरनॅशनल लि.कंपनीच्या संचालकावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामूळे नागरिकांत पसरलेला असंतोष परिणामी क्रेझी कॅसल वॉटर पार्कचे व्यवस्थापन, कर्मचारी आणि हल्दीराम फुड इंटरनॅशनल लि.कंपनीच्या संचालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तात्काळ फौजदारी कार्यवाही करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया" | |
| **4.** | "मालाड (प), मुंबई येथील लिंक रोडवरील, डि-मार्ट समोर, मुंबई मेट्रो-२ अंतर्गत पुलाचे काम सुरु असताना, पुलाचा लोखंडी सांगाडा कोसळल्याची गुरुवार, दिनांक १७.०५.२०१८ रोजी घटना घडणे, सकाळी व संध्याकाळी वर्दळीच्या वेळी लिंकरोड परिसरात, मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असणे, ज्या ठिकाणी सांगडा कोसळला त्याच्या समोरच बस | **नगरविकास विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | थांबा असून, तेथे प्रवासांच्या प्रतिक्षेत एका रांगेत अनेक रिक्षा उभ्या असणे, दुपारची वेळ असल्यामुळे, सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी न होणे, यापूर्वी मुंबई मेट्रो-७ चे काम सुरु असलेल्या गोरेगाव चेकनाका येथे, मेट्रो पुलाचा खांब कोसळून एक कामगार जखमी झाल्याची घटना घडणे, एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईत, सद्या मेट्रो-२ -अ, मुंबई मेट्रो-२ -ब या प्रकल्पांची कामे जोरात सुरु असून, किमान ५० टक्के काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याचे उद्दीष्ट असणे, परंतू वारंवार दुर्घटना होत असतानाही, सुरक्षेच्या दृष्टीने, योग्य ती उपाय योजना करणेबाबत एमएमआरडीए तसेच कंत्राटदार कंपनीकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याने, मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता न येणे, अलिकडेच उत्तर प्रदेशामधील, वाराणसी येथे भरदिवसा दुपारी उड्डाण पुलाचे काम चालू असताना, पुल कोसळून १८ जण चिरडून मरण पावल्याची भीषण दुर्घटना घडली असल्याने, सध्या मुंबईत अनेक प्रकल्पांची कामे सुरु असल्याने, यातुन संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **5.** | नागपूर शहरातील गुन्हेगारीचा आलेख पुन्हा उंचावत असून पोलीस यंत्रणा शहरात आहे की नाही अशी शंका उपस्थित केला जात असणे, दिनांक २४ व २५ जून, २०१८ या दोन दिवसात चार खुनांच्या घटनांनी शहर हादरले असतांनाच दिंनाक २६ जून, २०१८ रोजी पुन्हा एक खुनाची घटना घडलेली असणे, गिटीखदान परिसरातील कुख्यात गुडं कुलदीप ऊर्फ पिन्नु पांडे याच्यावर टोळी युध्दातून दिनांक २६ जून, २०१८ रोजी दुपारी दोन दुचाकीवर आलेल्या चार जणांनी पाच राऊडं गोळी झाडून हत्या करण्यात येणे, मॉडलमिल परिसरातील हनुमान मंदिराजवळ राहणारे नीरज पाळेश्वर विंचूरकर यांनी आईला घराबाहेर काढले म्हणून सख्या भावाची हत्या करणे, जागनाथ बुधवारी येथे दिनांक २२ जून, | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | २०१८ रोजी राजू रामभाऊ आमदे याने त्याच्याच भावाची हत्या केल्याची घटना उघडकीस येणे, एका तीस वर्षीय अनोळखी तरूणीची हत्या करून तिचा मृत्यदेह एमआयडीसी परिसरातील नागलवाडी शिवारात तरोटयाच्या झुडपात फेकुन दिल्याची घटना दिनांक २४ जून, २०१८ रोजी उघडकीस येणे, वडीलोपार्जीत मालमत्तेवरून नागपूर शहरातील एका राजकीय पदाधिकाऱ्यासह त्याच्या कुटूबातील पाच लोकांची हत्या करण्यात येणे, दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी २४ तासात शहरात दोन वेगवेगळया घटनेत दोन व्यक्तींचे खून झाल्याची घटना उघडकीस येणे, दिनांक ३ ते ५ मे, २०१८ च्या सुमारास शहरात तीन वेगवेगळया घटनेत तीन व्यक्तींचे खून झाल्याची घटना उघडकीस येणे, दिनांक ३१ एप्रिल, २०१८ रोजी नंदनवन परिसरातील पेट्रोलपंप येथे एकाची हत्या करून १३ लाख रूपये लुटल्याची घटना उघडकीस येणे, या घटनेसह नागपूर शहरात मागील पाच महिन्यापासून वारंवार खुनाच्या घटना डघडकीस येत असल्यामूळे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, वारंवार होत असलेल्या हत्येमूळे नागरिकांच्या सुरक्षेचा निर्माण झालेला प्रश्न, त्यामूळे नागरिकांत पसरलेले असंतोष परिणामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **6.** | "गत वर्षीच्या हंगामात तुरीचे मोठे उत्पादन झाले असणे, राज्यातील गोदामे पूर्णपणे भरलेली असणे, त्यात यावर्षीच्या तुरीची व हरभऱ्याची पडलेली भर, गोदामांच्या व बारदाना अभावी खरेदीची प्रक्रिया धिम्या गतीने होणे, बारदान नाही, गोदाम नाही, या कारणास्तव बहुतांश दिवस खरेदी केंद्रे बंद राहणे, दिनांक १५ मे, २०१८ रोजी तुरीची व दिनांक ११ जून, २०१८ रोजी हरभऱ्याची खरेदी केंद्रे बंद करणे, हमीभावाने खरेदी करताना ऑनलाईन नोंदणीची टाकण्यात आलेली अट, अनेक अडचणीवर मात करीत राज्यातील ७ लाख ७५ हजार ६९९ तूर व हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाईन केलेली नोंदणी, यापैकी तीन महिन्यांत केवळ ३ लाख ६५ हजार १५ | **पणन विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांची तूर व हरभऱ्याची हमी भावाने करण्यात आलेली खरेदी, उर्वरित ४ लाख १० हजार ६८४ शेतकऱ्यांची तूर-हरभऱ्याची खरेदी न होणे, खरेदीची प्रक्रिया थांबल्यानंतर शासनाने ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एक हजार रुपये अनुदान देण्याचे जाहीर करणे, खरेदी केंद्रावर शासनाकडून एका शेतकऱ्याची दररोज २५ क्विंटल तूर किंवा हरभऱ्याची होणारी खरेदी, या अनुदानासाठी प्रति हेक्टर दहा क्विंटल असे दोन हेक्टर पर्यंतच तूर किंवा हरभरा खरेदी करण्याची घातलेली अट, या मर्यादेपेक्षा जास्त तूर असलेल्या व जास्तची शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना बसलेला आर्थिक फटका, ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एसएमएस पाठवून माल खरेदी केंद्रावर आणावयास लावणे, तथापि, बारदाना व गोदामाअभावी या कारणास्तव परत पाठविणे, तसेच एसएमएस पाठवून तूर व हरभरा खरेदी केंद्रावर न आणलेल्यांना १००० रुपयाच्या अनुदानासाठी अपात्र ठरविण्याचे आदेश दिनांक १९ जून, २०१८ रोजी देण्यात येणे, परिणामी हजारो शेतकरी अनुदानापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली भिती, त्यामूळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **7.** | "राज्यातील अर्ध्याहुनही अधिक खाद्य व्यावसायिक विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या सुमारास निदर्शनास येणे, परवाना आणि नोंदणीशिवाय सुरु असलेल्या या व्यावसायिकांवर कोणतीही कारवाई केली जात नसणे, अनेक खाद्य व्यावसायिकांच्या कागदपत्रांची पडताळणी न करताच त्यांना परवाने जारी केल्याचा ठपका महालेखापालांनी अन्न व औषध प्रशासनावर ठेवणे, १६०० प्रकरणांपैकी १०५७ प्रकरणात आवश्यक दस्तऐवज सादर करण्यात आले नसतानाही अन्न व औषध प्रशासनाकडून खाद्य व्यावसायिकांना परवाने देण्यात आलेले असणे, राज्यात १६.८६ लाख खाद्य व्यावसायिकांपैकी फक्त ९.४३ | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये (औषधी द्रव्ये) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | लाख खाद्य व्यावसायिकांनी माहे जून, २०१६ पर्यंत नोंदणी केलेली असणे, उर्वरित ७.४३ लाख खाद्य व्यावसायिक नोंदणी आणि परवान्याशिवाय व्यवसाय करीत असल्याचे महालेखापालांनी आपल्या अहवालात म्हटल्याचे निदर्शनास येणे, नोंदणी आणि परवान्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज केला नसता, तर असे परवाने मुदतबाह्य ठरले जात असणे, अशा व्यावसायिकांनी त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी नव्याने अर्ज करुन नोंदणी परवाना घेणे आवश्यक असणे, विनापरवाना सुरु असलेल्या खाद्य विक्रेत्यांवर शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता त्यामुळे यासंदर्भात शासनाने करावयाच्या उपाययोजना व प्रतिक्रिया." | |
| **8.** | "ता.खामगाव, जि. बुलडाणा, पिंपळगाव राजा येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत कर्जमाफी व पीककर्ज मागण्यासाठी गेलेल्या भागवत कनिराम बघे या शेतकऱ्याला बँक व्यवस्थापकाने अपमानास्पद वागणूक देऊन बँकच्या बाहेर हाकलून देणे, हा अपमान सहन न झाल्याने भागवत कनिराम बघे या शेतकऱ्याने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या करणे, हिवराखुर्द येथील रहिवासी असलेले भागवत कनिराम बघे या शेतकऱ्याकडे स्टेट बँकेचे दिड लाख रूपयांचे कर्ज असणे, शासनाने दिलेल्या कर्जमाफीच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट असणे, असे असतांना सुध्दा कर्ज मागणाऱ्या शेतकऱ्याला बँकेतील अधिकाऱ्यांनी अपमानास्पद वागणूक देऊन बँकेतून हाकलून दिल्याने शेतकऱ्यास आत्महत्या करावी लागल्याची घटना दिंनाक २४ जून, २०१८ ला निर्देशनास येणे, असे असतांनाही सदर बँक व्यवस्थापकावर फौजदारी कारवाई न होणे, मलकापूर, जि. बुलडाणा दाताळा येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा व्यवस्थापक राजेश हिवसे यांने पीककर्ज काढण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीच्या मोबाईलवर फोन करून कर्ज मंजूर करण्याच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी करणे आणि ती मागणी पुर्ण करण्यासाठी बँकेच्या शिपायाने तिच्यावर दडपण टाकणे, या | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | गंभीर घटनेची तक्रार मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्यानंतर सुध्दा अघापही बँक व्यवस्थापकास पोलीसांनी अटक न करणे, तसेच बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सुध्दा कोणतीच कार्यवाही न करणे, या दोन्ही गंभीर घटना उघडकीस येऊन सुध्दा शासनाने कोणतीच दखल न घेतल्यामूळे आणि संबधितावर फौजदारी कारवाई व अटक करण्यात आलेली नसल्यामूळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांमध्ये पसरत असलेला असंतोष परिणामी या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **9.** | "मुंबईत सन २०१४ ते सन २०१६ या तीन वर्षाच्या कालावधीत, १६ ते २५ वयोगटातील सुमारे ३२ हजार ५९८ जण बेपत्ता झाल्याचा दिनांक २२.०५.२०१८ रोजी उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, बेपत्ता झालेल्या व्यक्तीमध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या अधिक असून तीन वर्षात बेपत्ता झालेल्या महिलांच्या संख्या १६ हजार ५३३ इतकी असणे, हरवणा-यांची संख्या वाढत असताना, दुसरीकडे त्यांना शोधुन काढण्याचे प्रमाण कमी होत असणे, मुंबई शहरात शालेय मुलांच्या अपहरणात अलिकडेच झालेली चिंताजनक वाढ आणि त्यानंतर आता महिलांच्या बेपत्ता होण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याने, मुंबईतील जनतेमध्ये महिला व मुलांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करण्यात येणे, मुंबई शहरात वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी सीसीटीव्ही बसविण्यात आले असतानाही, महिला व मुलांच्या गायब होण्याच्या प्रकारात वाढ झाल्याने, पोलीसांच्या कर्तव्यदक्षतेबाबत, निर्माण झालेले संशयाचे वातावरण, मुंबईतील नागरीकांना सुरक्षा प्रदान करणेबाबत आणि भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी, राज्य शासनाने | गृह विभाग |

| | | |
|---|---|---|
| | हस्तक्षेप करुन, सुस्त पोलिस यंत्रणेला सर्तक करण्यासाठी कठोर उपाय योजना करण्याच्या दृष्टीने, तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **10.** | "वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने प्रवेश देऊनही प्रत्यक्षात खासगी संस्थांकडून प्रवेश नाकारण्यात येत असल्याचे माहे एप्रिल २०१८ च्या सुमारास निदर्शनास येणे. शुल्क नियमन प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क महाविद्यालयांना मान्य नसणे. 'आम्ही सांगू तेवढे शुल्क भरा नाहीतर प्रवेश घेऊ नका' अशी भूमिका महाविद्यालयांनी घेतलेली असणे. महाविद्यालयांकडून करण्यात येणारी अडवणूक आणि वैद्यकीय शिक्षण संचालनालयाची मवाळ भूमिका यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची निर्माण झालेली शक्यता, अवघ्या दोन हजार जागांसाठी अत्यंत चुरशीतून प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थी अतोनात मेहनत करीत असून खासगी महाविद्यालयांमध्ये प्रवेश नाकारण्यात आल्याने त्यांचा झालेला भ्रमनिरास सदरील विद्यार्थ्यांनी डीएमईआरकडे आपले म्हणणे मांडणे, परंतु डीएमईआर प्रशासनानेदेखील याप्रकरणी हात झटकल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होणे. या प्रश्नी खासगी मेडिकल कॉलेजांनी आमच्या मागण्या शासन मान्य करीत नसल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याच्या निर्णयावर ठाम असल्याचे त्यांचे म्हणणे असणे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया." | **वैद्यकीय शिक्षण विभाग** |
| **11.** | "पनवेल (जि. रायगड) रसायनी परिसरातील कारखान्यावर, व्यवसायिक महसूल मुक्त वार्ता संचालनालयाच्या अधिक-यांनी दिनांक १४ जून २०१८ रोजी टाकलेल्या धाडीत, ३०८ किलो केटामाईन, ओपीयम व हशीश असे एकूण ४० कोटीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात येऊन, ११ जणांना अटक करण्यात येणे, सदरहू प्रकरणाची चौकशी केली असता, सदरहू आरोपी दर पाच दिवसांत १५ ते २० किला केटामाईन तयार | |

| | | |
|---|---|---|
| | करीत असून, महिन्याला सुमारे २५ कोटी रुपयाच्या केटामाईनचे उत्पादन करीत असल्याची धक्कादायक माहिती निदर्शनास येणे, सदरहू उत्पादन केलेले केटामाईन महाराष्ट्र, गोवा, पंजाब, गुजरात तसेच श्रीलंका, मोझांबिक, ब्रिटन, कॅनडा, मलेशिया, नेपाळ, ऑस्ट्रेलिया आदी देशात पाठवून तस्करी करीत असणे, सदरहू प्रकरणी दोन अंगडीया व्यवसायिक डिआरआयच्या रडारवर असतानाही, अद्याप या प्रकरणातील मुख्य सुत्रधारासह आरोपींना अटक करण्याबाबत, शासनाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी महाराष्ट्र व देशातील अनेक राज्यात केटामाईन्स हे अंमली पदार्थ पाठविण्यात येत असल्याने, देशाचे भवितव्य असलेली भावी तरुण पिढी वाममार्गाला जावून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **12.** | "राज्यात दिनांक २६ मे, २०१८ रोजी जाहीर झालेल्या सीबीएसईसीच्या निकालात ९० टक्केपेक्षा गुण मिळणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण सुमारे ५ टक्क्यांनी वाढले असून, तर ९५ टक्के मिळविणा-या विद्यार्थ्यांची संख्या ३ टक्क्यांने वाढल्याने, -सेल फायनान्स◦ प्रवेश मिळवताना राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना, सीबीएसईसीच्या ९० टक्के मार्कस मिळालेल्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करावी लागणार असणे, त्यातच गेले ५ वर्षामध्ये १२ वीची परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांच्या संख्या मोठया प्रमाणात वाढत असणे, सीबीएसईसी शाळांमध्ये गुण मिळण्याचे प्रमाण जास्त असल्याने, या विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयात, चांगल्या अभ्यासक्रमासाठी सहज प्रवेश उपलब्ध होणे, परंतू राज्य मंडळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता व चांगले र्माक्स असतानाही, केंद्रीय बोर्डाच्या शाळेशी नाहक स्पर्धा करावी लागत असून प्रवेशासाठी चांगल्या महाविद्यालयांना मुकावे लागले, परिणामी महाराष्ट्र राज्यातील स्थानिक | **शालेय शिक्षण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | भूमिपुत्र असलेल्या विद्यार्थ्यांना, महाविद्यालयीन प्रवेशामध्ये कमी गुणाअभावी डावलण्यात येऊन, केंद्रीय बोर्डाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना, महाविद्यालयामध्ये सहज प्रवेश उपलब्ध होत असणे, यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय, या संदर्भात अकरावी प्रमाणेच पदवीच्या प्रथम वर्षासाठीही गुणसमानता सुत्र वापरुन, महाविद्यालयीन प्रवेश देण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| 13. | चंद्रपूर जिल्हयात दारुबंदीची अंमलबजावणी १ एप्रिल, २०१५ पासून सुरु झाली असणे, परंतु मागील ३ वर्षात चोरटी दारु गाळप विक्री होत असणे, त्यामुळे येथे दारुबंदी फसवी असल्याची परिस्थिती दारुबंदी असलेल्या चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्हयातून दिसून येणे, या दारूबंदी जिल्हयात विषारी दारू पिल्याने अनेक निरपराध नागरिकांचा मृत्यू होणे, दारूबंदी असलेल्या जिल्हयातील पोलीस विभागाच्या आकडेवारीनुसार वर्षाकाठी करोडो रूपयांची अवैध दारू पकडल्याचे दिसून येत असल्याने या तीनही जिल्हयात पोलीसांच्या आर्शिवादाने अवैध दारू विक्रीचा महापूर सुरू असल्याने नागरिक मात्र भरडला जात असणे, या अवैध दारू विक्रीमूळे मोठया प्रमाणात सामान्य माणसाचे जीवन उध्वस्त होत असणे, हजारो बेराजगार, विद्यार्थी या धंदात उतरल्याने त्यांचे जीवन उध्वस्त होणे, त्यामूळे राज्य शासनाने दारूबंदी केलेली योजनाच फसवी असल्याचे चित्र दिसत असल्यामूळे नागरिकांत पसरत असलेला असंतोष परिणामी या दारूबंदी जिल्हयात दारूची विक्री होणारच नाही अशी भुमिका शासनाने घेणे, अन्यथा दारूबंदी उठवून पुन्हा दारू विक्री सुरू करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया." | **गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| 14. | "केंद्र सरकारच्या अपंग व्यक्ती हक्क कायदा २०१६ मधील, अपंगत्वाच्या २१ प्रकारामध्ये अपंगत्वाचे प्रमाण निश्चित करुन, तसेच प्रमाणपत्र अपंग व्यक्तीला देण्याचे आदेश निर्गमित केला असतानाही, महाराष्ट्र राज्यात त्याची पूर्णपणे अंमलबजाणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, यामुळे हजारो अपंगांना, अंपगत्वाचे प्रमाणपत्र न मिळाल्याने, त्यापासून मिळणा-या अत्यावश्यक लाभापासून वंचित रहावे लागणे, शेकडो अपंगांनी प्रमाणपत्रासाठी, मा. मुख्यमंत्री कार्यालय, सेवा हमी कायदा तसेच माहिती अधिकाराखाली विचाराणा करुनाही, अद्याप अपंगांना, अपंगत्वाचे प्रमाणपत्र शासनाकडून उपलब्ध न होणे, केंद्रीय अपंग कल्याण मंडळाने, माहे जानेवारी २०१८ मध्ये आरोग्य विभागाला सर्व प्रकारचे अपंग प्रमाणपत्रे देण्याबाबत निर्देश देऊनही, अद्याप आरोग्य विभागाच्या माध्यमातून, -एसएडीएम॰ या संगणक प्रणालीच्या माध्यमातून केवळ ६ प्रकाराच्या अपंगत्वाबाबत प्रमाणपत्र देण्यात येत असणे, या व्यतिरिक्त अन्य १५ प्रकारची अपंगत्वाचे प्रमाणपत्र अद्यापही देण्यात येत नसल्याने, प्रमाणपत्राअभावी अपंगांचे प्रचंड हाल होणे, सदर गंभीर बाब शासनाच्या निदर्शनास वारंवार आणूनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे राज्यातील गरजू अपंगावर झालेला अन्याय, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **सार्वजनिक आरोग्य विभाग** |
| 15. | ‘‘वांद्रे-वरळी (मुंबई) सागरी सेतूजवळील समुद्रात उभे असलेले ‘आर्क डेक बार’ हे तरंगते हॉटेल शुक्रवार, दिनांक 25.05.2018 रोजी खडकाला धडकल्याने पाणी शिरुन बुडाल्याची घटना घडणे, सदरहू तंरगत्या हॉटेलला परवानगी देण्याचा अधिकार महाराष्ट्र सागरी मंडळाला (मेरिटाईम बोर्डाला) नसतानाही गेले 3 वर्षापासून समुद्रात तरंगत्या हॉटेलला बेकायदा परवानगी देऊन मेरिटाईम बोर्ड महसूल जमा करीत असल्याचा | **पर्यटन विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, तसेच तरंगत्या हॉटेलच्या व्यवसायाच्या नफात 11 टक्के भागीदारी एमटीडीसीची असतानाही गेले 3 वर्षापासून कोणत्याही प्रकाराचा नफा या तरंगत्या हॉटेलच्या मालकाने एमटीडीसीला दिला नसल्याची बाब उघड होणे, सदरहू प्रकरणात छोटया बोटीने खोल समुद्रात असलेल्या तरंगत्या हॉटेलमध्ये हजारो नागरीक जात असल्याने त्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही उपाययोजना तसेच काळजी घेण्यात आली नसल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, तसेच एखादी दुर्घटना घडल्यास मदत कार्य करणारी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे हॉटेलमध्ये जाणा-या ग्राहकाच्या जीविताला निर्माण झालेला धोका, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | |
| **16.** | ''वडाळा (मुंबई) लॉर्ड इस्टेट बिल्डींग ॲटॉपहिल येथील दोस्ती विकासकाने बांधलेल्या इमारतीच्या वाहन तळाची भिंत विकासकाने केलेल्या निकृष्ट दर्जाचे काम व इमारतीच्या बाजूला सुरु असलेल्या कामाच्या खोदकामामुळे पडून इमारतीजवळ मोठा खड्डा झालेला असणे, तुटलेली भिंत व खचलेले वाहन तळ यासाठी विकासकाने केलेले निकृष्ट दर्जाचे काम दिनांक २५ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, दोन दिवस सतत पडणारा पाउस व एका इमारतीच्या बाजूलाच दुसरी इमारत बांधण्यासाठी खोदण्यात आलेला खड्डा यामुळे जमीन खचून वहाने खड्ड्यामध्ये पडणे, सदर इमारत धोकादायक झाल्यामुळे रहिवाश्यांना इमारत रिकामी करण्याचे निर्देश देण्यात येणे, सदर प्रकरणामुळे त्वरित स्थलांतर करण्याबाबत आलेल्या आदेशामुळे रहिवाश्यांत निर्माण झालेली समस्या, विकासकाने झालेल्या प्रकाराबद्दल स्वतःची जवाबदारी टाळणे, सदर घटनेबाबत लोकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने सबंधित अधिकारी व कर्मचारी यांचावर करावयाची कारवाई व उपाययोजना '' | **नगरविकास विभाग** |
| **17.** | "बालभारतीने दहावीच्या भूगोलाच्या नकाशात अनेक चुका केल्याने विद्यार्थ्यांना चुकीची माहिती मिळणार असल्याचे | **शालेय शिक्षण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | नुकतेच निदर्शनास येणे, तसेच दहावीच्या इंग्रजी माध्यमाच्या विज्ञानाच्या पुस्तकात शब्दांच्या (स्पेलिंग) आणि संकल्पनांच्या मांडणीत अनेक चुका झालेल्या असणे, भूगोल शिकविताना आवश्यक असलेला पिकांचा नकाशा उद्योगांचा नकाशा पुस्तकातून हद्दपार केलेला असणे, एका देशाचा पूर्ण भूगोल माहिती झाल्याशिवाय दोन देशांचा तुलनात्मक अभ्यास शिकविणे, देशातील हरित पट्ट्यांची तुलना करणाऱ्या नकाशामध्ये तसेच पावसाचे प्रमाण दाखविताना चुका झालेल्या असणे, इंग्रजी माध्यमाच्या विज्ञानाच्या पुस्तकात प्रजनन संस्थेची माहिती देतानाही अनेक चुका झालेल्या असणे, शालेय पुस्तकात प्रजनन संस्थेचा केलेला समावेश स्वागतार्ह असला तरी पुस्तकनिर्मिती करताना लिहिलेला मजकूर तज्ज्ञांकडून तपासून घेणे आवश्यक असणे, नीटसारख्या परीक्षा देताना मिळालेल्या सदरील चुकीच्या माहितीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य माहिती मिळावी यासाठी सदरील पुस्तकामध्ये झालेल्या चुका दुरुस्ती करण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया." | |
| **18.** | ‘‘भायखळा (मुंबई) येथील जे.जे. रुग्णालयात वॉर्ड क्र. 11 मध्ये शस्त्रक्रियेसाठी दाखल केलेल्या झायराबी या महिलेचा मृत्यू झाल्याच्या घटनेमुळे संतापलेल्या नातेवाईकांनी दिनांक 18 मे, 2018 रोजी सायंकळी ६.४५ वाजता डॉक्टरावर हल्ला केल्याची घडलेली घटना, हल्ल्याच्यावेळी तेथे एकही सुरक्षा रक्षक उपस्थित नसल्यामुळे झालेल्या मारहाणीत डॉ.अतिश पारेख यांच्या डोळयाखालील हाड फ्रॅक्चर होऊन त्यासोबत डॉ. शालमली धर्माधिकारी आणि परिचारीका याही जखमी होणे, या घटनेच्या निषेधार्थ रुग्णालयातील 400 निवासी डॉक्टरांनी मार्ड या निवासी डॉक्टरांच्या संघटनेच्या माध्यमातून कामबंद आंदोलन सुरु करण्यात येणे, त्यास परिचारीकांनीही पाठिंबा दिल्याने रुग्णालयातील रुग्णांची औषधोपचार व सेवे अभावी गैरसोय होऊन त्यांच्या आरोग्यास | **सार्वजनिक आरोग्य विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | निर्माण झालेला धोका, गेले काही वर्षात उपचार करताना रुग्ण दगावल्याने डॉक्टरांवर होणा-या हल्ल्याच्या घटनेमध्ये सातत्याने होत असलेली वाढ, सदरहू आंदोलनास मुंबईतील सर्वच रुग्णालयातील डॉक्टरांनी पाठिंबा व्यक्त करुन आंदोलनामध्ये सहभागी होणे, यामुळे जे.जे. रुग्णालयासह मुंबईतील सर्वच रुग्णालयातील रुग्णांची झालेली प्रचंड गैरसोय, रुग्णालयामध्ये पुरेषा प्रमाणात सुरक्षा व्यवस्था नसल्याने अनेकवेळा नातेवाईकांच्या चुकीमुळे रुग्ण दगावण्यास कारणीभूत ठरत असतानाही नातेवाईकांच्या रोषाला डॉक्टरांना जबाबदार धरण्यात येत असणे, यामुळे डॉक्टरांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, परिणामी राज्यातील सर्वच रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था धोक्यात आली असल्याने सदर प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.’’ | |
| **19.** | “राज्यामध्ये ऑटिस्टिक ह्या गुंतागुंतीच्या आजाराने त्रस्त असलेल्या मुलांची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या, प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे या मुलांच्या जीवनासंदर्भात निर्माण झालेला प्रश्न ऑटिस्टिक मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासनाकडे कोणतीही यंत्रणा कार्यान्वित नसणे, स्वतःच्याच जगात हरवून जाणा-या स्वमग्नता मुलांमध्ये ऑटिझम हा गुंतागुंतीचा आजार वाढीस लागलेला असून गेल्या काही वर्षांमध्ये याचे प्रमाण वाढलेले असल्याची चिंताजनक परिस्थिती, सन-1985 मध्ये अडीच हजारांत एक असे प्रमाण असणे पुढे दहा वर्षांनी पाचशे मुलांत एक तर सन-2001 मध्ये अडीचशे मुलांमध्ये एक, सन-2004 मध्ये 166 मुलांमध्ये एक, सन-2009 मध्ये 110 मुलांमध्ये एक आणि सद्यस्थितीत शंभरच्या आत मुलांमध्ये एक, आणि मुंबईसारख्या शहरांमध्येतर 68 मुलांमध्ये एक इतके प्रमाण आढळले असल्याची धक्कादायक माहिती माहे जुन, 2018 च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान उघडकीस येणे, जिल्हा रुग्णालयांच्या पातळीवर त्यांना गतिमंद किंवा | **सार्वजनिक आरोग्य विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | मतिमंद म्हणूनच दाखले दिले जात असून गतिमंद आणि मतिमंद हे वेगवेगळ्या स्थिती असून अशा मुलांना वेगवेगळे स्वतंत्र दाखले देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, अशा रुग्णांवर उपचार करण्याची कोणतीही यंत्रणा जिल्हा प्रशासनाबरोबरच राज्य शासनाकडेही नसणे, अशा मुलांना स्वतंत्र दाखले देऊन त्यांचेकरिता स्वतंत्र शाळा, मार्गदर्शन केंदे सुरु करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच आरोग्य विभागाकडे दिनांक 25 जून,2018 रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या करुनही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे सदरची परिस्थिती अधिकच बिकट होणे, याबाबत राज्यातील मोठ्या शहरांबरोबरच जिल्हा पातळीवर ऑटिस्टिक मुलांसाठी विशेष यंत्रणा तयार करुन त्यांच्या पुढील वाटचालीकरिता लवकरात लवकर आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी वेळीच हस्तक्षेप करुन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | |
| **20.** | “राज्यामध्ये जेष्ठ नागरीकांचे मोठया प्रमाणात हाल होत असल्याचे माहे जून, २०१८ च्या सुमारास निदर्शनास येणे, मुलांनी घरातील वृध्दांचे संगोपन करण्यासंदर्भातील कायदा अद्यापही कागदावरच असणे, ७० टक्के वृध्द मंडळी मुले व सुनांकडून होणारी छळवणूक सहन करत हतबलतेने जीवन जगत असणे, लातूरमध्ये वृध्द आई-वडिलांवर मुलाने नारळाच्या पाण्यातून विष प्रयोग केल्याने त्यात वडिलांचा मृत्यु होणे, यामुळेच वृध्द नागरीकांच्या सुरक्षेचा वृध्दांना आधार देणारा कायदा सन २००७ मध्ये अस्तित्वात येणे, सदर कायद्यातंर्गत जेष्ठ नागरीकांना पाल्यांकडून निर्वाहखर्च देण्याची तरतूद असणे, प्रत्येक जिल्हयातील उपविभागासाठी न्यायाधिकरण स्थापण्यात आले असणे, पालकांचा सांभाळ न केल्यास ३ महिन्यांपर्यंत तुंरुगवास किंवा ५० हजार रुपयांच्या | **सामाजिक न्याय विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | दंडाची तरतुदही कायद्यात असणे, असे असतानाही ७० टक्के वृध्द मुले किंवा सुनांकडून होणारा अपमान आणि छळ सहन करीत असणे, तसेच जेष्ठ नागरीक एकटेच घरात असल्याचे प्रमाणही मोठया प्रमाणात असणे, मुंबईमध्ये वांद्रे येथे वृध्द दांपत्याचा खून मोलकरीण व तिच्या पतीने केल्याचे निदर्शनास येणे, अशी अनेक प्रकारची प्रकरणे उघडकिस येणे, जेष्ठ नागरीकांची सुरक्षा व वृध्द पालकांचा सांभाळ करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **21.** | " राज्यात गत ४ वर्षामध्ये ३२ वाघांचे मृत्यु झाले असल्याचे माहे जून २०१८ च्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, यांची गंभीर दखल घेत राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांना (वन्यजीव विभाग) शासनाने याबाबत केलेली चौकशी, मृत्यु झालेल्या ३२ पैकी २३ वाघांचा नैसर्गिक मृत्यु होणे, ८ वाघ शिकारीमुळे, तर १ वाघ अपघातात ठार झालेला असणे, निधी असूनही बेफिकिरी आणि निष्काळजीपणाच्या कारणामुळे वनविभागाला वाघ सांभाळता येत नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झालेले असणे, पेंच व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या कोलितमाराजवळ पेंच नदीत २४ फेब्रुवारीला एक वाघ मृतावस्थेत आढळला असणे, परंतु सदर वाघ हा तीन दिवसाअगोदरच मृत झाला असणे, २५ फेब्रुवारीला चिमूर वनपरिक्षेत्रातील भान्सुली वन बीटमध्ये एका वाघाचा उपचाराअभावी मृत्यु झालेला असणे, गोरेवाडा येथील वन्यप्राणी बचाव केंद्रात एका “ली” नावाच्या वाघिनीला “साहेबराव” या वाघांपासून पिल्ले झाली असणे, परंतु प्राणिसंग्रहातील वाघिणीचे पिल्ले सांभाळ करण्याची पध्दत वेगळी असणे, मात्र गोरेवाडा प्रशासनाला ही बाब समजली नसल्यामुळे अवघ्या २४ तासांत वाघिणीच्या सुदृढ पिलांचा जीव गेलेला असणे, सदर वाघिण पिल्लांना जन्म देणार आहे ही बाब माहीत असतांना सुध्दा तज्ज्ञांची मदत घेण्याची तत्परता प्रशासनाने दाखविली नसणे, तसेच २६ फेब्रुवारीला ब्रम्हपूरी वनविभागाच्या तळोधी वनपरिक्षेत्रातील गंगासागर | **वन विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | हेटी बिटात आढळलेल्या दोन महीन्याच्या वाघाच्या बछडयाचा चंद्रपूर येथील वन्यजीव उपचार केंद्रात मृत्यु झालेला आईपासून या बछडयाला नागपूर येथे उपचारासाठी आणण्यात येणार होते परंतु याबाबतही वनविभागाने निर्णय घेण्यास केलेली दिरंगाई यामुळे व्याघ्र प्रेमीमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, सदर वाघांच्या मृत्युस जबाबदार असणाऱ्या वनविभागाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| **22.** | पावसाळ्यात मुंबईत झाडे कोसळण्याचे प्रकार सुरूच असून दिनांक २४/०६/२०१८ रोजी मुंबईतील मेट्रो सिनेमाजवळील महात्मा गांधी मार्ग येथे आझाद मैदानाला लागून असलेले झाड कोसळून एका ज्येष्ठ नागरिकाचा झालेला मृत्यू, मुंबईत आजमितीस एकूण २९ लाख ७५ हजार २८३ झाडे असून त्यापैकी शासकीय जमिनीवर ११ लाख २५ हजार १८२ झाडे, रस्ते, फूटपाथवर १ लाख ८५ हजार ३३३, उद्याने व बगिचांमध्ये १ लाख १ हजार ६७ आणि खाजगी जमिनीवर १५ लाख ६३ हजार ७०१ झाडे असणे, मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी मुंबई महानगरपालिकेने केलेल्या माहे फेब्रुवारी २०१८ पासून केलेल्या सर्वेक्षणानुसार पालिकेची जबाबदारी असलेल्या १ लाख २२ हजार झाडांपैकी ८८ हजार आणि खाजगी जागेवरील ४ हजार झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याची नितांत गरज असणे, दिनांक १ जून,२०१८ रोजी पर्यंत पालिकेने आपल्या ८८ हजार झाडांची छाटणी केलेली असणे, परंतु खासगी हद्दीतील नोटीस दिलेल्या केवळ ३ हजार झाडांची आजतागायत छाटणी झाली असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, त्यामुळे सद्यस्थितीत तेथील नागरिकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, महापालिकेकडून धोकादायक झाडांच्या फांद्या छाटण्यासाठी विशेष मोहीम राबविली जात असताना, खासगी हद्दीतील जागांवरील झाडांच्या फांद्या छाटण्यास होत असलेली दिरंगाई, परिणामी झाडे कोसळून मोठ्या प्रमाणावर होत | **नगरविकास विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | असलेली जीवित आणि वित्त हानी, दिनांक १ जून २०१८ पासून आजतागायत झाडे पडल्याच्या पालिका क्षेत्रात ४६, तर खासगी क्षेत्रात १५३ घटना घडलेल्या असणे, फांद्या कोसळण्याच्या पालिका क्षेत्रात १८२ आणि खासगी क्षेत्रात ३५२ घटना घडलेल्या असणे, त्यामुळे भविष्यात झाडे कोसळून होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी मुंबईतील खासगी क्षेत्रातील धोकादायक झाडांची तातडीने छाटणी करण्यासाठी शासनाने हाती घ्यावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. | |
| **23.** | "केंद्र व राज्य शासनाने "डिजिटल इंडिया" ची योजना आखली असली तरी राज्यातील १३ हजार ८४४ शाळांमध्ये अद्यापपर्यंत वीजच पोचली नसून तब्बल ४४ हजार ३३० शाळातील विद्यार्थ्यांना संगणक म्हणजे काय याचा गंधही नसल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, "युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन "या संस्थेने दिलेल्या अहवालातील वास्तव्यामुळे राज्याच्या शालेय शिक्षण विभागात खळबळ उडणे, यंदाच्या वर्षात वीज नसलेल्या शाळांची आणखी ७४२ ने भर पडल्याची माहिती "युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन" या संस्थेच्या अहवालातून दिसून येणे, दरम्यान कोट्यवधी रुपये खर्चुनही हजारो विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहिल्याने नागरीकांत विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया” | **शालेय शिक्षण विभाग** |
| **24.** | मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहती मोडकळीस आल्याच्या तक्रारींत दिवसेदिवस होत असलेली वाढ, तरीदेखील मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतींची देखभाल-दुरुस्ती केली जात असल्याबाबत प्रशासनाकडून वारंवार सांगण्यात येणे, वरळी (मुंबई) येथील चाळ क्रमांक २८ या पोलीस वसाहतीतील सार्वजनिक स्वच्छतागृहाचा स्लॅब कोसळून वंदना कदम हि गृहिणी जखमी झाल्याची नुकतेच | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | दिनांक २६/०६/२०१८ रोजी घडलेली घटना, सदर घटनेमुळे या वसाहतींच्या देखभाल – दुरुस्तीबाबत प्रशासनाकडून करण्यात येत असलेला दावा फोल ठरणे, पोलीस वसाहतीत राहणाऱ्या पोलिसांच्या दरमहा वेतनातून ३० टक्के इतकी रक्कम घरभाड्यापोटी शासनाकडून कापण्यात येणे, तरीदेखील या वसाहतींत मुलभूत सोयी- सुविधांचा असलेला अभाव, मुंबईतील बहुतांश पोलीस वसाहती जिंर्ण झाल्या असल्याने मोडकळीस आलेल्या असणे, सदर वसाहतीतून पोलीस कर्मचारी जीव मुठीत घेवून वास्तव्य करीत असणे, तरीदेखील शासनाकडून या वसाहतींच्या देखभाल – दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत नसल्याने पोलीस बांधवांत आणि त्यांच्या कुटुंबियांत पसरलेली नाराजीची भावना, त्यामुळे मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतींच्या देखभाल –दुरुस्तीचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याबाबत, तसेच मोडकळीस आलेल्या वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **25.** | "वाकडी (ता.जामनेर, जि.जळगावं) येथील मराठी शाळेजवळील कर्ण फाट्यावर दिनांक १० जून, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता अल्पवयीन मुले सवर्णाच्या विहीरित पोहण्यास गेल्या कारणास्तव विहिरीच्या मालकाने व शिक्षकांनी सदर मुलांना नग्न करुन शेतातील खोलीत पट्याने बेदम मारहाण करणे, मारहाणीनंतर त्या परिसरातून दोन्ही मुलांची नग्नधिंड काढण्यात येणे, या मारहाणीबाबत कुणाला सांगितल्यास त्यांना जीवे मारण्याची दिलेली धमकी देण्यात आल्यामूळे त्या मुलांनी कोठेही वाच्यता केलेली नसणे, या गंभीर घटनेमूळे घाबरलेल्या मुलांनी पोलीसांकडेही तक्रार केलेली नसणे, मात्र या प्रकरणात मारहाणीची व्हिडिओ व्हायरल झाल्याने सदर घटना उघडकीस येणे, त्यामुळे पिडीत मुलाच्या आईने पोलीसात तक्रार दाखल करणे, बुधवार, दिनांक १३ जून, २०१८ रोजी पोलीसांत केलेली तक्रार मागे घेण्यासाठी पिडीतांना सबंधिताकडून दबाव टाकण्यात येणे, | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | एवढी मोठी घटना उघडकीस येऊन सुध्दा राज्य शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. त्यामूळे राज्यात अनेक ठिकाणी या घटनेबाबत निर्माण झालेला संताप तरी सुध्दा याबाबत संबधितांवर कोणतीच कारवाई होत नसल्यामूळे नागरिकांत पसरत असलेला असंतोष परिणामी या गंभीर प्रकरणी संबंधित आरोपींना कठोरात कठोर शिक्षा होण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |